प्रयास, फिर से प्रयास और तबतक प्रयास जब तक जीत न हासिल हो जाये, यही सफलता का मूलमंत्र है।

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार २ मार्च २०२५ | अंक ८३● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# वाल्मिक कराडच संपूर्ण हत्या प्रकरणाचा मास्टरमाईंड !

## जो तो उठेल आणि आपल्या आड येईल तर आपण भिकेला लागू ....!

## संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा सूत्रधार वाल्मिक कराडच

### आडवा येणाऱ्यास संपवा

दरम्यान ७ डिसेंबर रोजी रोजी सुदर्शन घुले याने वाल्मीक कराड यास कॉल केला त्यावेळी वाल्मीक कराड याने सुदर्शन घुले यास सांगितले की, जो तो उठेल आणि आपल्या आड येईल तर आपण भिकेला लागू असेच होत राहिले तर कोणतीही कंपनी आपल्याला खंडणी देणार नाही. आता जो कोणी आड येईल त्याला आडवा करावाच लागेल. कामाला लागा अशा सूचना केल्या. पुढे संतोष देशमुख यांची अमानुषपणे मारहाण करुन त्यांची हत्या करण्यात आली.

मुंबई - वृत्तांकन

या प्रकरणात वाल्मिक कराड याचा दाखल आरोपपत्रात आरोपी क्रमांक एक म्हणून उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे एक प्रकारे वाल्मिक कराडच या संपूर्ण हत्या प्रकरणाचा मास्टरमाईड असल्याचे आरोपपत्रातून मांडण्यात आलेले आहे. सीआयडीने दाखल केलेल्या आरोपपत्रात वाल्मिक कराड याचा प्रमुख आरोपी म्हणून उल्लेख आहे. एकूण आरोपींत वाल्मिक कराड हा आरोपी क्रमांक एक आहे. त्यानंतर आरोपपत्रात विष्णू चाटे हा दुसऱ्या क्रमांकाचा आरोपी आहे. या हत्या प्रकरणाचा तपास करत असताना सीआयडीला पाच महत्त्वाचे साक्षीदार सापडले आहेत. हे पाचही साक्षीदार गोपनीय आहेत. याच साक्षीदारांच्या जबाबानंतर सीआयडीने वाल्मिक कराडविरोधात सर्व पुरावे गोळा केलेले आहेत. खंडणी, अॅट्रॉसिटी आणि संतोष देशमुख यांची हत्या या तिन्ही गुन्ह्यांचा एकत्रितपणे उल्लेख करण्यात आला आहे.

८ डिसेंबर २०२४ तारखेला एकूण पाच साक्षीदारांपैकी एक साक्षीदार हा सुदर्शन घुले याच्यासोबत होता. नांदूर फाटा येथील हॉटेल तिरंगा येथे विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले यांची एक भेट झाली होती. या भेटीत विष्णू चाटे याने घुले यास वाल्मिक कराडचा निरोप दिला होता. संतोष देशमुख हा आडवा आला तर त्याला कायमचा धडा शिकवा असा हा संदेश होता, असे सीआयडीने दाखल करण्यात आलेल्या आरोपपत्रात नमूद आहे. मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर ९० दिवसात आरोपपत्र दाखल करण्याची मुभा तपास एजन्सीला असते. मात्र संतोष देशमुख हत्या प्रकरणात केवळ ८० दिवसात चार्जशीट दाखल झाली. या संपूर्ण प्रकरणात पहिल्यांदा दाखल झालेला खंडणीचा गुन्हा हा अॅट्रॉसिटीशी सुसंगत होता.




अॅट्रॉसिटी चा मारहाणेशी आणि मारहाणीचा हत्येशी अशी गुन्ह्यांच्या साखळीचा मोठा उलगडा आरोप पत्रात झालाय. हे तीन गुन्हे एकमेकांपासून वेगळे असल्यास ते तर तीन चार्जशीट दाखल झाले असत्या मात्र सीआयडीने या तीनही प्रकरणांचा एकत्रित उल्लेख केला आहे. या आरोपपत्रामधून वाल्मीक कराड हाच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा सुत्रधार असल्याचं पोलिसांनी दाखल केलेल्या दोषारोपपत्रातून सिद्ध झालं आहे. त्यामुळे वाल्मीक कराड भोवती आता कारवाईचा फास पूर्णतः आवळला गेलेला आहे. माध्यमांशी बोलताना याबद्दल राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पोलिसांनी अतिशय प्रोफेशनल तपास केला आहे. नवीन कायद्याचा अवलंब करून योग्य वेळेमध्ये आणि संपूर्ण पुराव्यांसह आरोपपत्र दाखल केले आहे. आता आम्ही कोर्टालाही विनंती करणार आहोत की त्यांनी ही केस फास्ट ट्रॅकवर चालवावी. उज्वल निकम यांची आपण नियुक्ती केली आहे आणि मला विश्वास आहे की जे आरोपी आहेत त्यांना कठोरतम शिक्षा कोर्ट देईल, असे फडणवीस म्हणाले. तसेच या प्रकरणात सुमारे १८० साक्षीदार, पंच यांच्या मदतीने तपासानंतर केल्यानंतर दाखल गुन्ह्यातील आरोपींचा सूत्रधार वाल्मिक कराड असल्याने त्यास पहिल्या क्रमांकाचा आरोपी बनविण्यात आले आहे. तपास अधिकारी बसवराज तेली यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या तपासातील ङ्गडिजिटलफ स्वरुपाचे पुरावे न्यायवैधक प्रयोगशाळेकडून तपासून दोषारोप तयार करण्यात आले आहे.

**चार्जशीटमध्ये कोणत्या क्रमांकावर कोण आरोपी,**

वाल्मिक कराड - एक नंबर
विष्णू चाटे- दोन नंबर
सुदर्शन घुले - तीन नंबर
प्रतीक घुले - चार नंबर
सुधीर सांगळे - पाच नंबर
महेश केदार - सहा नंबर
जयराम चाटे - सात नंबर
फरार कृष्णा आंधळे - आठ नंबर

दरम्यान तपास अधिकाऱ्यांनी दोषारोप पत्र दाखल केल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी त्यांनी आरोपींना कठोर शिक्षा मिळेल असा विश्वास व्यक्त केला आहे,

# मला पुण्यातील प्रश्न विचारा वाल्मिक कराडच्या प्रश्नावर पंकजा मुंडेच उत्तर

पुणे - बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी सीआयडीने दीड हजार पेक्षा अधिक पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. वाल्मीक कराड हाच संतोष देशमुख यांच्या हत्येतील मास्टरमाईड असल्याचा दावा आरोप पत्रात केला आहे. यासंदर्भात पंकजा मुंडे यांना प्रश्न विचारला असता त्या पत्रकारावरच संतापल्याचे पाहायला मिळाले. पुण्यात त्या पत्रकारांशी संवाद साधत होत्या. यावेळी त्यांना वाल्मीक कराड यांच्यासंदर्भात प्रश्न करण्यात आला. त्यानंतर त्यांचा पारा चांगलाच चढलेला दिसला.

त्यावर उत्तर न देता पंकजा मुंडे रागावल्या. मी सद्या पुणे शहरात आहे. पुण्यातील स्वारगेट प्रकरणाची मी चौकशी व पाहणी करण्यासाठी आले असता मला येथील प्रश्न का विचारत नाहीत तुम्ही लोक. तुम्हाला टार्गेट दिले आहे, ते प्रश्न तुम्ही विचारत आहे. मी आता पुण्यात आहे तर मला पुण्यातील प्रश्न विचारा, असे पंकजा मुंडे म्हणाल्या. यावेळी त्या आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाल्या.त्या आरोपपत्रात काय लिहिले तुम्ही वाचले का? दोषारोपपत्रात काय लिहिले आहे, ते मला माहीत नाही. तुमच्यावर कोर्ट ऑफ कन्टेट दाखल



होईल. बीडचा विषय मागे पडला आहे. तुम्हाला टार्गेट दिले आहे, ते प्रश्न तुम्ही विचारत आहे. मी आता पुण्यामध्ये आहे. पुण्यामध्ये महिलेवर स्वारगेट एसटी स्टँडमध्ये बलात्कार झाला आहे. मला तो प्रश्न विचारा, मी पुण्यात आलेली आहे. तर मला बीडचे प्रश्न का विचारतात.? असा सवाल पंकजा मुंडे यांनी पत्रकारांना केला. मी गृह खात्याशी संबंधित नाही आणि गृह खात्याच्या अधिका-यांनी ही माहिती देणे योग्य आहे. ते जी काही माहिती द्यायची ती कोर्टाला देतील. त्यानंतर जे योग्य आहे ती कारवाई व्हावी. माझा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर संपूर्ण विश्वास आहे. त्यांनी याबाबत एकदा शब्द दिल्यानंतर त्यांच्या टीम मधील एक मंत्री म्हणून मी वारंवार याबाबत भाष्य करणे माझ्या भूमिका साजेसे नाही. संवेदनशीलपणे या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे, जलद गतीने झाली पाहिजे हे माझे एक हजार एकवेळा बोलून झालेले आहे, असे देखील पंकजा मुडे म्हणाल्या.

मदेशमुख यांच्या हत्याबाबत तीव्र निषेध आणि तसेच या प्रकरणाची वेगळी चौकशी करावी हे मी किती वेळा बोलू ? घटना घडल्यापासून मी त्यावर बोलत आहे. १२ डिसेंबरचे माझे भाषण काढले तर त्यामध्ये ९० टक्के मी त्याबाबतच बोलले आहे. आता त्याच्या आतल्या बाबींवर बोलण्याचा औचित्य नाही आणि मला माहिती देखील नाही, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या.

# तहसिल कार्यालयातील सच्चा सारथी भारत मुळूक सेवानिवृत्त

बीड । (प्रतिनिधी) येथील तहसिल कार्यालयातील वाहन चालक या पदावर कार्यरत असलेले भारत मुळूक हे दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी आपल्या सेवेतून निवृत्त झाले आहेत. गेली अनेक वर्षे महसुल विभागातील एक सच्चा सारथी म्हणून मुळूक यांनी कर्तव्य बजावलेले आहे. बीड येथील महसुल विभागातील आणि तहसिल कार्यालयात वाहन चालक पदावर कार्यरत असलेले भारत मुळूक हे वयोमानानुसार दि.२८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाले. आपल्या कर्तव्याशी अत्यंत प्रामाणिक राहून त्यांनी सेवा बजावली.बीड येथे कार्यरत असताना अनेक तहसिलदारांच्या वाहनाचे चालक




म्हणून त्यांनी उत्कृष्ट सेवा बजावलेली आहे. सर्व अधिका-यांसह, कर्मचा-यांशी त्यांचे सलोख्याचे संबंध राहीले. आपल्या कार्यकाळात त्यांनी कर्तव्याला प्राधान्य देत केलेली सेवा महसुल विभागात उल्लेखनीय ठरली आहे. मुळुक यांनी २९ वर्ष सेवा केली असून त्यातील पंधरा वर्षे त्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तर तहसीलदार, पुरवठा अधिकारी यांच्यासोबत त्यांनी सेवा बजावलेली आहे.

# कांबळे, कदम आणि सरवदे यांना सेवानिवृत्ती निमित्ताने निरोप मुख्य अभियंता सुनिल इंगळे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार

परळी /प्रतिनिधी औष्णिक विद्युत केंद्र परळी येथील भांडार विभागचे प्रमुख कार्यकारी अभियंता रामचंद्र सोपानराव कांबळे, केमिकल लॅब संच क्र ८ चे उप कार्यकारी रसायनशासत्रज्ञ मधुकर उद्धव कदम (गुरुजी) आणि उपकरण नियंत्रण विभाग संच क्र ६ - ७ चे तंत्रज्ञ भागवत नारायणराव सरवदे यांना दि.२८ फेब्रुवारी रोजी सायं ५ वा. प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात सेवापूर्ती कार्यक्रम



त निरोप देण्यात आला. या सेवानिवृत्त अधिकारी कर्मचा-यांचा मुख्य अभियंता सुनिल इंगळे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी उप मुख्य अभियंता महेश महाजन, प्रभारी उप मुख्य अभियंता हिम्मतराव अवचार, अधीक्षक अभियंता संभाजी बुकतारे, अधीक्षक अभियंता राजीव रेड्डी, कार्यकारी अभियंता सुरेश गर्जे, वरिष्ठ व्यवस्थापक वित्त व लेखा विभागाचे अरविंद येरणे,संच क्र ६ - ७ चे कार्यकारी रसायनशासत्रज्ञ सतीश मुंडे, संच क्र ८ चे कार्यकारी रसायनशासत्रज्ञ दिनेश कदम, कार्यकारी अभियंता मदन पवार, सर्व विभाग प्रमुख तसेच गावाकडून आलेले आप्त स्वकीय,उरणवरुन आलेले जे.एन.पाटील कुटुंब, के एस तुपसागर ,पुण्यावरुन आलेले अरुणधर्माधिकारी,आर.आर.माने,एन.एम.फड, दीपक कदम,कल्पना मुंडे,एक.जी.भोयर हे उपस्थित होते.उप कार्यकारी अभियंता शिवाजी होटकर, कामगार नेते हरिराम गित्ते, बाबा गायसामुद्रे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सेवानिवृत्ती अधिका-याची चित्रफीत दाखवण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन के एच गित्ते मॅडम यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सहायक कल्याण अधिकारी शरद राठोड यांनी मानले.

# वडवणीत हजारोंच्या उपस्थितीत ऐतिहासिक शिवजन्मोत्सव सोहळा पार पडला

वडवणी ।प्रतिनिधी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती वडवणी शहरात भुतो ना भविष्याती साजरी करण्यात आली आहे. यामध्ये विविध कला पथकाच्या चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. उंट, घोडे, महापुरुषांची वेशभूषा, सजवलेल्या मेघडंबरी राजमहालात छत्रपती शिवाजी महाराज यांची मुर्ती आर्कषक देखावा विविध कला




सादर करुन ऐतिहासिक डिजेमुक्त सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला आहे. या सोहळ्याला मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी भेट दिली होती.गेल्या आठ दिवसांपासून वडवणी येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सवाची तयारी अगदी जोमाने सुरू होती. शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी रोजी वडवणी शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा मेघडंबरी राजमहाल आर्कषक देखावा सादर करण्यात आला. तसेच कोल्हापूर येथील कलाकारांची प्रसिध्द नादमय ढोल ताशा ध्वजपथकाने ढोल ताशांच्या गजरात मंत्रमुग्ध केले.

# अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात बीड जिल्ह्याचा कायापालट होईल बीड विधानसभा मतदारसंघातून जिल्ह्यात सर्वाधिक सदस्य नोंदणी करावी

## डॉ.योगेश क्षीरसागर यांचे प्रतिपादन; बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सदस्य नोंदणी सुरू

दि.१ : अजितदादा पवार यांच्याकडे बीड जिल्ह्याचे पालकत्व असून आता जिल्ह्याचा कायापालट होईल. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटन देखील मजबूत केले जात आहे. जिल्ह्यात बीड विधानसभा मतदारसंघातून सर्वाधिक सदस्य नोंदणी करावी, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

बीडमध्ये के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात शनिवारी (दि.१) करण्यात आली. याप्रसंगी डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य अविरत सुरू आहे. बीड लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघाचे निवडणुकीचे निकाल अनपेक्षित लागले. पराभव मान्य करून आपण कामाला लागलो. अजितदादा पवार हे कार्यक्षम नेतृत्व आहेते. त्यांच्या नेतृत्वात पक्ष संघटन मजबूत होत आहे. जातपात, धर्मभेदाला त्यांच्याकडे थारा नाही. विकासाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी अजितदादा कटिबद्ध असतात. पालकमंत्री पद त्यांच्याकडे असल्याने जिल्ह्याचा विकास आता कुणीही थांबवू शकत नाही. जिल्ह्यात चांगले अधिकारी येतील. अजितदादांकडून बीडसाठी विशेष अधिकारी दिला जाणार आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड विधानसभा मतदारसंघातून जिल्ह्यात सर्वाधिक पक्ष सदस्य नोंदणी करू, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक इंगळे यांनी केले. सूत्रसंचलन करून प्रा.पांडुरंग सुतार यांनी आभार मानले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, महिला-पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीस विभागाच्या सहसचिव, उपसचिव यांसह सर्व जिल्ह्यांचे जिल्हा पुरवठा अधिकारी आदी दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित होते.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार २ मार्च २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

# मायमराठीचा उत्सव

अलीकडेच मराठी शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी झाल्याचे निरीक्षण आहे. मराठी चित्रपटांकडे प्रेक्षकांचे दुर्लक्ष होत आहे. मात्र, मराठी सर्जनशीलतेत विविध क्षेत्रांत प्रगती झाली आहे. मराठीत विज्ञान-तंत्रज्ञान आणि अर्थकारणाची भाषा बनण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. साहित्य संमेलन आणि प्रदर्शने साहित्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. मराठी शाळांमधील विद्यार्थी कमी होत आहेत, मुंबई-पुणे यांसारख्या महानगरांतील काही मराठी शाळांना विद्यार्थी मिळत नाहीत, मराठी चित्रपटांकडे प्रेक्षक पाठ वळवत आहेत, मराठी पुस्तकांची एक हजारांची आवृत्ती खपण्यास काही वर्षे लागतात... यांसारख्या निरीक्षणवजा वक्तव्यांची मराठीजनांना एव्हाना सवय झाली आहे; कारण ही नकारात्मक भाषा सुरू होऊनही तीन दशके लोटली आहेत. या काळात मराठी माध्यमातून शिकणाऱ्यांचे प्रमाण काहीसे कमी झाले असेल; मराठी चित्रपट पाहणाऱ्यांची संख्याही रोडावली असेल अन् मराठी पुस्तके वाचणारेही घटले असतील; परंतु मराठीतील चित्रपटनिर्मिती, ग्रंथनिर्मिती कमी झाली असे नाही. उलट गेल्या २५ वर्षांत मराठी सर्जनशीलता अनेक क्षेत्रांत चमकली. चित्रपटांत नवे प्रयोग करण्यापासून नाटकांच्या पुनरुज्जीवनापर्यंत आणि पुस्तकांसाठी विविध विषय हाताळण्यापासून वाचनसंस्कृतीसाठी ‘पुस्तकांचे गाव’सारखा उपक्रम राबविण्यापर्यंत गोष्टी घडल्या. याचा अर्थ, मराठीसाठी खूप चांगले दिवस आले असे नाही; परंतु ती संकुचित झाली नाही हे, खरे. बारा कोटी लोकांची भाषा अशी सहजासहजी संकुचित होतही नसते. मात्र, जगातील सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांपैकी पहिल्या पंधरात असलेल्या मराठीची जेवढी भरभराट व्हायला हवी होती, तेवढी झालेली नाही, हेही खरे. महाराष्ट्राच्या समाजजीवनाची, प्रशासनाची, संस्कृतीची मुख्य भाषा असलेली मराठी ही विज्ञान तंत्रज्ञानाची आणि मुख्य म्हणजे अर्थकारणाची भाषा बनणे आवश्यक आहे. तसे झाल्यास मराठीचा वेलू गगनावरी जाऊ शकेल. त्यासाठी मराठीजनांना आपली भाषा केवळ भावना आणि अभिव्यक्तीपुरता मर्यादित न ठेवता ती बाजारपेठेची भाषा बनवावी लागेल, आधुनिक शिक्षणाची भाषा बनवावी लागेल. यासाठी सरकारने कायदे वगैरे केले, तरी कृतीसाठी सर्व मराठीजनांना आपली भाषिक अस्मिता टोकदार करावी लागेल. आजचा मराठी भाषा गौरवदिन थाटात साजरा करतानाच तिच्या उत्कर्षासाठी असा विचार करणे अगत्याचे ठरते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक दिनदर्शिकेत मराठी भाषा गौरवदिन आता चांगलाच रुजला आहे. सुभाषितवजा काव्यपंक्तींनी मराठी काव्याचे माधुर्य वाढविणारे, ‘ज्ञानपीठ’ विजेते ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून २७ फेब्रुवारीचा दिवस विविध कार्यक्रमांनी, मराठी भाषा आणि संस्कृती यांचा जागर करून साजरा केला जातो. आपल्या मायबोलीसाठी मराठीजनांना एकत्र येण्याची संधी आजचा दिवस देतो. अलीकडेच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असल्याने त्याचा उत्साह सर्वत्र जाणवतो आहे. गेल्या आठवड्यात राजधानी दिल्लीत पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला एरवीच्या साहित्य संमेलनाइतकी गर्दी नसली, तरी त्याच्या स्थानमाहात्म्यामुळे त्याला वेगळे महत्त्व प्राप्त झाले. साहित्य संमेलनांना येत असलेल्या उत्सवाच्या स्वरूपावर काही छिद्रान्वेषी मंडळींकडून टीका होत असली, तरी असा उत्सव वातावरणात चैतन्य निर्माण करणारा असतो. साहित्य संमेलनांच्या आयोजनात आणि त्यांतील कार्यक्रमांत दोष असतात, यात शंका नाही; परंतु या माध्यमातून समाजातील मोठ्या घटकांपर्यंत पोहोचता येते. आपल्याकडे पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर आदी शहरांचा अपवाद वगळता बहुतेक शहरांत निरखळ साहित्यविषयक पुस्तकांची दुकानेही नाहीत. संमेलने, प्रदर्शने यांमुळे पुस्तके सर्वदूर जाण्यास मदत होते. विविध संमेलनांमुळे विचारांची देवाण-घेवाण होते, अभिव्यक्तीला व्यासपीठ मिळते. त्यामुळे सर्वच संमेलनांचे आणि मराठीच्या उत्सवासाठीच्या सर्व उपक्रमांचे स्वागतच करायला हवे.

# दोषी राजकारण्यांवर निवडणूक लढण्यावर आजीवन बंदी का नाही

गुन्हेगार हा गुन्हेगारच असतो कारण गुन्हा हा लहान-मोठे अशा पध्दतीने ठरविला जात नाही. त्यामुळे सर्वसामान्यांनी केलेला गुन्हा असो अथवा राजकारण्यांनी केलेला गुन्हा असो यांना समान वागणूक व समान शिक्षा व्हायला पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे.ही बाब राजकीय पुढा-यांनी लक्षात ठेवली पाहिजे.परंतु देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की, राजकीय पुढा-्यांनी आपल्या स्वार्थासाठी आपल्या पध्दतीने नियम व कायदे बनविल्याचे दिसून येते.त्यामुळे अनेक राजकारणी बाहुबली या नावाने ओळखले जाते.सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडून दोषी खासदार आणि आमदारांना निवडणूक लढण्यास कायमची बंदी घालावी का,यावर उत्तर मागितले होते.या प्रकरणी केंद्र सरकारने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. प्रत्युत्तरादाखल,असे म्हटले गेले की गुन्हेगारी प्रकरणांमध्ये दोषी ठरलेल्या राजकारण्यांना शिक्षा भोगल्यानंतर आयुष्यभर निवडणूक लढवण्यास बंदी घालता येत नाही.या प्रतिज्ञापत्रावरून असे लक्षात येते की,केंद्र सरकारने सादर केलेले प्रतिज्ञापत्र फक्त राजकारण्यांच्याच फायद्याचे असल्याचे दिसून येते व यावरून स्पष्ट होते राजकारणी गुन्हेगार आणि सर्वसाधारण गुन्हेगार यात जमीन-आसमानचा फरक आहे हे सरकार प्रतिज्ञापत्रा सिध्द केल्याचे दिसून येते. आपण अनेकदा पहाले सर्वसाधारण गुन्हेगारांना थर्ड ग्रेडची वागणूक दिली जाते आणि राजकीय गुन्हेगारांना किंवा राजकारण्यांना व्हिआयपीची ग्रेडची वागणूक दिली जाते ही सर्वात मोठी तफावत राजकारणी आणि सर्वसामान्यांच्या गुन्हेगारीमध्ये दिसून येते.सध्याच्या परिस्थितीत कोणत्याही सरकारी कामाकरीता पोलिस व्हेरिफिकेशन असने गरजेचे असते आणि केलेही पाहिजे.यातुन हे सिद्ध होते की त्या व्यक्तींवर काही गुन्हा तर दाखल झाला नाही ना! यामध्ये विद्यार्थी, सर्वसामान्य,नौकर वर्ग, व्यापारी, व्यावसायिक, नौकरीसाठी आवेदन करणारे बेरोजगार युवक यांच्या पोलिस व्हेरिफिकेशनमध्ये जर कोणताही छोटा-मोठा गुन्हा आढळला तर त्याचे संपूर्ण आयुष्य धुळीस मिळते.हालाकी त्याने आपल्या गुन्हेगारी प्रवृत्तीला तिलांजली जरी दिली असली तरीही त्याला कायद्याच्या माध्यमातून गुन्हेगार ठरविण्यात येतो. परंतु राजकारणी जेव्हा अनेक गुन्ह्यांनी लथपथ होतात तेव्हा ते अनेक पळवाटा शोधतात व तो मार्ग त्यांना सहज अवगत होतो.कारण कायदे बनविणारे राजकारणीच असतात त्यामुळे आपल्या सोयीनुसार कायद्यात उलटफेर करून आपल्या हिताचे करतात.ॲड अश्विनी उपाध्याय यांनी २०१६ मध्ये जनहित याचिका दाखल केली होती.यामध्ये लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम ८ आणि ९ च्या संवैधानिक वैधतेला आव्हान देण्यात आले आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने असे म्हटले होते की राजकीय पक्षांनी स्वच्छ प्रतिमेचे लोक का शोधू शकत नाहीत,हे स्पष्ट करावे अशी मागणी याचिकेत केली आहे.मी याचिकाकर्त्यांच्या मताशी पुर्णपणे सहमत आहे.कारण देशात असलेल्या गुन्हेगारांना जर राजकीय पक्ष प्रथम प्राधान्य देत असेल व खतपाणी घालत असेल आणि अशा परिस्थितीत त्यांना स्वच्छ प्रतिमेचा व्यक्ती दिसत नसेल तर ही कसली लोकशाही म्हणावी!आज देशात हजारो गुन्हेगारांनी राजकारणात प्रवेश करून आमदार खासदार मंत्री बनुन लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी झाल्याचे दिसते ही बाब लोकशाहीला घातक आहे.आज सर्वसामान्यांनी थोडासाही गुन्हा केला तर त्यांच्यावर कठोर कारवाई करून तुरूंगात डांबले जाते व त्यांच्या परिवाराची उलटसुलट तपासणी करून टॉर्चर केले जाते.परंतु याबाबतीत राजकीय पुढा-यांबाबद मात्र शिथिलता दिसून येते.हा सर्वसामान्यांवर अन्याय नाही का? यावरून स्पष्ट होते की राजकीय पुढारी आपल्या हिताप्रमाणे कायद्यात बदल करून आपली राजकीय पोळी नेहमीच शेकत असतात ही बाब जगजाहीर आहे.म्हणुनच केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, गुन्हेगारी प्रकरणांमध्ये दोषी ठरलेल्या राजकारण्यांना शिक्षा भोगल्यानंतर आयुष्यभर निवडणूक लढण्यापासुन रोखता येणार नाही.यात संपूर्णपणे राजकीय पुढा-यांचा व राजकारण्यांचा स्वार्थीपणा स्पष्ट दिसून येतो.जर एखाद्या सरकारी कर्मचा-्यांला दोषी ठरवण्यात आले,तर तो आयुष्यभर सेवेबाहेर रहातो,मग दोषी व्यक्ती संसदेत कशी काय येऊ शकते?कायदे मोडणारे कायदे कसे बनवू शकतात? सध्याच्या कायद्यानुसार,जर एखाद्या व्यक्तीला फौजदारी प्रकरणात २ वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षा झाली तर शिक्षा पूर्ण झाल्यानंतर ६ वर्षांच्या कालावधीसाठी त्याला निवडणूक लढवण्यास मनाई आहे.एवढे असुनही राजकारण्यांची मनमानी दिसून येते.विद्यार्थी, बेरोजगार युवक व अन्य संघटना यांनी मोर्चे काढले यांच्यावर जेव्हा गुन्हा दाखल होतो तेव्हा हाच गुन्हा पोलिस व्हेरिफिकेशनमध्ये आड येतो अशा परिस्थितीत त्या युवकांना आपल्या कॅरीअर पासुन वंचित राहावे लागते हा त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर मोठा आघात व प्रहार पडतो.परंतु राजकारण्यांना मात्र राजकारण करण्यासाठी मोकळीक हवी असते त्या पध्दतीने कायदे वळवितात ही बाब सर्वसामान्यांसाठी व लोकशाहीसाठी घातक आहे असे मी समजतो. राजकारणी मोठमोठ्या घोटाळ्यांनी व अनेक गुन्ह्यांनी लथपथ असतात तरीही त्यांचे राजकारण सुरळीत आणि सुखरूप सुरूच असते त्यामुळे यांच्यावर अंकुश असने गरजेचे आहे.याकरीता सर्वोच्च न्यायालय, महामहीम राष्ट्रपती यांना विनंती करतो की सर्वसामान्यांनप्रमाणेच राजकारण्यांना शिक्षा व कायद्याची संपूर्ण बंधने असायला हवे.



लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी,

---------

# मानवी चुकांचे परिणाम वन्य प्राण्यांना भोगावे लागतात

कठीण बनवत आहे. मानवी चुकांचे परिणाम वन्य प्राण्यांना भोगावे लागतात; वन्यजीवांना त्यांच्या प्राणांचे बलिदान देऊन हवामान बदलाच्या परिणामांची सर्वात मोठी किंमत मोजावी लागते. मानवी प्रगतीमुळे वन्यजीवांचे थेट नुकसान होते, त्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होतात आणि प्रदूषणामुळे मृत्यू होतात. अनेक वेळा रस्ते अपघात, वीज कोसळणे, उघड्या खड्ड्यात किंवा शेताच्या विहिरीत बुडून वन्य प्राण्यांचा मृत्यू होतो. रस्त्यांचा विकास वाढत असताना, वेगवान वाहनांमुळे वन्य प्राण्यांच्या मृत्यूचा धोका वाढतो. वन्य प्राण्यांसाठी शिकार हा आणखी एक धोका आहे. वन्यजीवांमध्ये मृत्यूची इतर कारणे म्हणजे रोग, दुखापत, परजीवीवाद, उपासमार, कुपोषण, निर्जलीकरण, हवामान परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती आणि इतर प्राण्यांकडून होणारी शिकार. वाढत्या मानवी क्रियाकलापांमुळे तलाव, गवताळ प्रदेश आणि जंगले यांसारख्या अधिवासांचे नुकसान होते, ज्यामुळे वन्यजीवांना सहज वावरणे कठीण होते. परिसंस्थेत सतत बदल होत असतात, ज्यामुळे वन्यजीवांना अन्न, पाणी आणि त्यांच्या पिल्लांना वाढवण्यासाठी चांगल्या नैसर्गिक जागांपासून वंचित ठेवले जाते. प्रदूषणामुळे हवा, माती आणि पाणी दूषित होऊन जंगलांपर्यंत पोहोचते. वर्ल्ड वाइल्डलाइफ फंडच्या लिव्हिंग प्लॅनेट रिपोर्ट २०२४ नुसार, गेल्या ५० वर्षांत (१९७०-२०२०) वन्यजीवांच्या लोकसंख्येचा सरासरी आकार विनाशकारीरीत्या ७३ टक्क्यांनी कमी झाला आहे. अहवालात असा इशारा देण्यात आला आहे की नैसर्गिक विनाश आणि हवामान बदलामुळे पृथ्वीच्या काही भागांमध्ये धोकादायक पातळीला पोहोचत आहे, ज्यामुळे मानवतेसाठी गंभीर धोका निर्माण झाला आहे.

गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात ४१ वाघ आणि ५५ बिबट्यांची शिकार करण्यात आली. आरटीआय अर्जाद्वारे मिळवलेल्या माहितीनुसार, २०२० ते जानेवारी २०२५ दरम्यान राज्यात १६८ वाघ आणि ८०८ बिबट्यांचा मृत्यू झाला आहे. अधिका-यांनी म्हटले आहे की बहुतेक मृत्यू नैसर्गिक कारणांमुळे आणि अपघातांमुळे झाले आहेत, तरी शिकारीमुळे वाघांच्या मृत्यूची संख्या चिंतेचा विषय आहे. एका शिकारविरोधी तज्ज्ञाचे म्हणणे आहे की स्थानिक शिकारी या हत्यांमध्ये मोठी भूमिका बजावतात आणि ते पुढे म्हणतात की क्रूर टोळ्यांकडून होणा-या संघटित शिकारीच्या ९० टक्क्यांहून अधिक घटनांची नोंदच केली जात नाही. २००२ ते २०२३ पर्यंत, महाराष्ट्राने ८६७ हेक्टर ओलसर प्राथमिक जंगल गमावले, जे १.२८ मेट्रिक टन कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनाच्या समतुल्य आहे. आदर्शपणे राज्यात ३३ टक्के वनक्षेत्र असायला हवे, परंतु सध्या ते फक्त १६.५३ टक्के आहे. इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट २०२३ नुसार, गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्रातील वनक्षेत्र सुमारे ५४.५ चौरस किलोमीटरने कमी झाले आहे.अधिकृतपणे मान्यताप्राप्त स्त्रोतांकडून संकलित केलेल्या जागतिक बँकेच्या विकास निर्देशकांच्या संग्रहानुसार, २०२२ मध्ये भारतातील एकूण वनक्षेत्र ७२६९२८ चौरस किमी नोंदवले गेले. रिमोट सेन्सिंग सॅटेलाइट डेटा आणि फील्ड-बेस्ड इन्व्हेंटरीच्या व्याख्येवर आधारित फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाने तयार केलेल्या द्वैवार्षिक अहवालानुसार, २०२३ पर्यंत भारतातील एकूण वन आणि वृक्षाच्छादन ८,२७,३५७ चौरस किमी होते, जे देशाच्या भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे २५ टक्के व्यापते. भारताच्या राष्ट्रीय वन धोरणानुसार, पर्यावरणीय स्थिरता राखण्यासाठी जंगलाखालील एकूण भौगोलिक क्षेत्राचा आदर्श टक्केवारी किमान ३३ टक्के असणे आवश्यक आहे. २०१० ते २०१८ दरम्यान, काही भागात ५० टक्क्यांपर्यंत मोठी झाडे नष्ट झाली. २०१० ते २०२२ पर्यंतच्या उपग्रह प्रतिमांचा वापर करून, संशोधकांना असे आढळून आले की २०१८ ते २०२२ दरम्यान अंदाजे ५६ लाख मोठी झाडे नाहीशी झाली. २०३० पर्यंत, भारतातील ४५-६४ टक्के जंगले हवामान बदल आणि वाढत्या तापमानाच्या परिणामांना सामोरे जातील. आजच्या आधुनिक सुविधा, साधनसंपन्न समाज आणि सरकार असूनही, बुद्धिमान माणूस अनेक प्रसंगी कमकुवत आणि निराश होतो व आत्महत्या किंवा गुन्हा करतो. मग अशा परिस्थितीत जर वन्यजीवांना अन्न आणि पाण्याची गरज भागवण्यासाठीही संघर्ष करावा लागत असेल, तर त्यांची अवस्था किती वाईट असेल याची कल्पना आपण करू शकतो, अशा परिस्थितीत त्यांनी कुठे जावे, कसे जगावे?



डॉ. प्रितम भि. गेडाम

# वीर योद्धा, कुशल सेनापती, पराक्रमी संभाजी, अलौकिक महापराक्रमी शूरवीर संभाजी राजे

पूर्ण नाव
छत्रपती संभाजीराजे शिवाजीराजे भोसले
जन्म
१४ मे १६५७
पुरंदर किल्ला, महाराष्ट्र
मृत्यू
११ मार्च १६८९
तुळापूर, महाराष्ट्र (समाधीः वढू, महाराष्ट्र)
------------

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. राजपुत्र असल्यामुळे रणांगणावरील मोहिमा आणि राजकारणातील डावपेच यांचे बाळकडू त्यांना लहानपणापासूनच मिळाले.संभाजी महाराजांच्या आई, महाराणी सईबाईचे निधन महाराज लहान असतानाच झाले. त्यानंतर पुण्याजवळील कापूरहोळ गावची धाराऊ ही स्त्री त्यांची दूध आई बनली. संभाजी महाराजांचा सांभाळ त्यांची आजी राजमाता जिजाबाई यांनी केला.त्यांच्या सावत्र आई, पुतळाबाई यांनी देखील त्यांच्यावर खूप माया केली. मात्र त्यांची सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजी महाराजांना पोरकेपणाने वागवले तसेच संभाजी महाराजांच्या राजकीय कारकिर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला.

अनेक ऐतिहासिक नोंदींप्रमाणे संभाजी महाराज अत्यंत देखणे आणि शूर होते. तसेच ते अनेक भाषांत विद्याविशारद व अत्यंत धुरंदर राजकारणी होते. राजकारणातील बारकावे त्यांनी भराभर आत्मसात केले होते. मुघल दरबारातील घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले तर त्याचा त्यांना भविष्यात उपयोग होईल या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले. त्यावेळी संभाजीराजे ९ वर्षांचे होते. शिवाजी महाराज कैदेतून निसटल्यानंतर स्वराज्यापर्यंतची धावपळ संभाजी राजांनी सोसू नये आणि त्यामुळे त्यांना काही काळ सुरक्षित ठिकाणी ठेवणे गरजेचे होते. त्यामुळे शिवाजी महाराजांनी त्यांना मोरोपंत पेशव्यांच्या मेहुण्याच्या घरी मथुरेला ठेवले. मुघल सैनिकांचा संभाजी राजांच्या मागचा ससेमिरा थांबवण्याच्या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा पसरवून दिली. ते महाराष्ट्रात पोहोचल्यानंतर काही काळाने संभाजी महाराज सुखरूपपणे स्वराज्यात येऊन पोहोचले. **तारुण्य** - इ.स. १६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला तोपर्यंत संभाजीराजे राजकारणातील लहान बारकावे आणि रणांगणातील डावपेचांमध्ये तरबेज झाले होते. त्यांच्या विनम्र स्वभावाने राज्याभिषेकासाठी रायगडावर आलेल्या प्रतिनिधींना त्यांनी आपलेसे केले.

शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर १२ दिवसात जिजाऊंचे निधन झाले. त्यानंतर संभाजीराजांकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही. शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.

तरुण संभाजीराजांचे शिवाजी महाराजांच्या दरबारातील अनुभवी मानक-यांशी अनेकदा मतभेद होऊ लागले. संभाजी महाराजांचा अमात्य अण्णाजी दत्तोंच्या कारभाराला सक्त विरोध होता. शिवाजी महाराजांनी अण्णाजी हे अनुभवी आणि कुशल प्रशासक असल्यामुळे त्यांच्या भ्रष्ट कारभाराकडे अनेकदा दुर्लक्ष केले. पण संभाजी महाराजांना ते मान्य होणे कठीण होते. अण्णाजी दत्तो आणि इतर अनुभवी मानकरी संभाजी महाराजांच्या विरोधात गेले.दरबारातील काही मानकरी संभाजी महाराजांना अपमानास्पद वागणूक देऊ लागले; हे केवळ अण्णाजी दत्तोंच्या सांगण्यावरून केले. त्यांच्या विरोधामुळे त्यांना शिवाजी महाराजांबरोबर दक्षिण हिंदुस्थानच्या मोहिमेवर जाता आले नाही. तसेच शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीत संभाजी महाराजांचे हुकूम पाळण्यास अष्टप्रधानमंडळाने नकार दिला. त्यामुळे शिवाजी महाराजांना कोकणातील शृंगारपूरचे सुभेदार म्हणून संभाजी महाराजांना पाठवावे लागले.**महाराजांना वाचवण्याचे प्रयत्न** छत्रपती संभाजी महाराज संगमेश्वरी पकडले गेल्यानंतर त्यांना वाचवण्याचे प्रयत्न झाले नाही असे नाही. महाराजांना वाचवण्यासाठी प्रयत्न मावळ्यांनी केले पण ते त्यात यशस्वी झाले नाही. यात सर्वात पहिला प्रयत्न हा जोत्याजी केसरकर यांनी केला. पुढे जाऊन अप्पा शास्त्री यांनी देखील महाराजांना सोडवण्याचा प्रयत्न केला पण हे दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले.**शारीरिक छळ व मृत्यू** - मुघलांनी पकडल्या नंतर संभाजी महाराज आणि त्यांचे सल्लागार कवी कलश यांना औरंगजेबापुढे किल्ले बहादुरगड, आता धर्मवीरगड येथे आणण्यात आले. मऔरंगजेबाने संभाजी महाराजांना सर्व किल्ले त्याच्या स्वाधीन करून स्वतंत्र जिवन जगन्याचेफ किंवा धर्मांतरण करून इस्लाम धर्म स्वीकार करून मुसलमान बनल्यास जीवनदान देण्याचे मान्य केले. पण संभाजी महाराजांनी त्याला स्पष्टपणे नकार दिला. त्यानंतर औरंगजेबाने संभाजी महाराज आणि कवी कलश यांची विदूषकाचे कपडे घालून अत्यंत मानहानीकारक अशी धिंड काढण्यात आली. शेवटी दोघांनाही नर्क यातना देउन क्रूरपणे अत्यंत हालहाल करून ठार मारायचा आदेश दिला.

**दगाफटका** इ.स. १६८९च्या सुरुवातीला संभाजी महाराजांनी त्यांच्या महत्त्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणात संगमेश्वर येथे बोलावले. १ फेब्रुवारी, इ.स. १६८९ रोजी बैठक संपवून संभाजी महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने महाराजांच्या नजीकच्या मदतीने संगमेश्वरावर हल्ला केला, फ्रेंच गवर्नर गेनरल मार्टीनने त्याच्या डायरीत याची नोंद करून ठेवली आहे, की जवळच्या माणसांनी दगाफटका केला. कारवाईसाठी गुप्तता बाळगली आणि सर्व कारवाईची आखणी खूपच काळजीपूर्वक केली. मराठ्यांत आणि शत्रूच्या सैन्यात चकमक झाली. मराठ्यांचे संख्याबळ कमी होते. प्रयत्नांची शर्थ करूनही मराठे शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाहीत. शत्रूने संभाजीमहाराजांना व त्यांच्यासोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.

**माहिती संकलन**
**पत्रकार - सोपान पगारे**
**मो. ८०१०८९६७२२**

# छत्रपती शिवरायांबद्दल गरळ ओकणा-या कोरटकर विरोधात लिंबागणेशकरांचे जोडे मारो आंदोलन

## तातडीने अटक करून कठोर कारवाई करा :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेशः- ( दि. ०१ ) रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज , राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल आक्षेपार्ह व बदनामीकारक वक्तव्य करून शिवप्रेमींच्या भावना दुखावणा-या नागपुरच्या प्रशांत कोरटकर यांना तात्काळ अटक करून त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि. ०१ शनिवार रोजी सकाळी ११ वाजता लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोरदार घोषणाबाजी करत प्रशांत कोरटकर यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला.ईतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना मोबाईल वरून धमकी देताना प्रशांत कोरटकर यांने महाराष्ट्राची अस्मिता असलेले रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल हिनकस वक्तव्य केले असुन दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न देखील केला आहे.तसेच विकृत लेखक जेम्स लेन यांनी छत्रपती शिवाजी महाराज व




राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल अत्यंत विकृत लिखाणाचे समर्थन करून तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत. मराठा समाजाला शिविगाळ करून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे तसेच ईतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्याचे नाव घेऊन सदर व्यक्तीने हे वक्तव्य करत धमकी दिल्यामुळे हे प्रकरण अत्यंत संवेदनशील असुन तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत करण्यात आली आहे. यावेळी आंदोलनात राजेभाऊ आप्पा गिरे, सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती अध्यक्ष अशोक वाणी, विक्रांत वाणी,अँड.गणेश वाणी,बाळकृष्ण थोरात, भगवान मोरे ,लक्ष्मण वाणी, भालचंद्र गिरे, दादा गायकवाड, नामदेव वाणी, सौरभ जाधव,रत्नाकर वाणी,संजय पावले, अशोक जाधव,पांडुरंग कानडे , कृष्णा कानडे, हनुमंत निर्मळ आदी सहभागी होते.

# मुलाला कॉपी पुरविणाऱ्या त्या नायब तहसीलदारावर अखेर गुन्हा दाखल



बारावीच्या विद्यार्थ्यांना कॉपी पुरवताना नायब तहसीलदाराला रंगेहाथ पकडण्यात आले असल्याची घटना नगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात घडली.नायब तहसीलदाराचे नाव अनिल तोरडमल असून आता प्रशासनाकडू न त्यांच्यावर कारवाईचाबडगा उघडण्यात आला आहे. त्याच्यावर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ते हरिहर गर्जे व किसन आव्हाड यांनी ही घटना प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. या संदर्भात केंद्रसंचालक शिवाजी दळे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अनिल तोरडमलच्या विरोधात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्याचे काम चालू होते. बारावीची परीक्षा सुरू झाल्यापासून तोरडमल आपल्या मुलासोबत परीक्षा केंद्रात येत होता. त्याच्याकडे असलेल्या शासकीय ओळखपत्रामुळे त्याला कोणी मज्जाव केला नाही; मात्र आज बारावीचा जीवशास्त्राचा पेपर चालू असताना केंद्रावर बंदोबस्तास असलेले पोलिस उपनिरीक्षक एम. व्ही. गुट्टे यांना तोरडमल यांच्यावर संशय आल्याने त्याची माहिती दळे यांना दिली.त्यानंतर त्यांनी तोरडमल यांच्याकडे विचारपूस केली. त्याने चुकीची उत्तरे दिली, त्यानंतर आपण अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात नायब तहसीलदार असून, आपला मुलगा परीक्षा देत असल्याने आपण येथे आलो असल्याचे सांगितले. परीक्षा केंद्राबाहेर जाऊ द्या, अशी विनंती त्याने पोलिस व केंद्रसंचालकांना केली; मात्र त्याला पोलिसांनी बाहेर जाऊ दिले नाही.

# तेजस्विनी ग्रुप आयोजित बीडमध्ये रंग बरसे होली कार्यक्रम

बीड : चूल आणि मूल या विचारांच्या पलीकडे जाऊन महिलांनी स्वअस्तित्व निर्माण केले पाहिजे. दैनंदिन जीवनाच्या जिम्मेदारीतून कधीतरी मोकळं होऊन काही क्षण स्वतःसाठी जगले पाहिजे यासाठी बीडमधील महिला वर्गात बहुचर्चित असलेल्या तेजस्विनी ग्रुपकडून महिलांना धुलिवंदनानिमित्त मनोरंजनाची खास मेजवानी मिळणार आहे. दि.१४ मार्च २०२५ रोजी सकाळी ११. ०० ते ४. ०० वाजता रामकृष्ण लॉन्स, कॅनॉल रोड, बीड येथे बीडमधील महिलांकरिता तेजस्विनी ग्र ुप आयोजित रंग बरसे होली या कार्यक्रमाचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले



असून हा कार्यक्रम केवळ आणि केवळ महिलांच्याच उपस्थितीत पार पडणार आहे आणि विशेष म्हणजे या कार्यक्रमात महिलांच्या सुरक्षेचा पूर्ण विचार करून महिलांसाठी स्पेशियल सुरक्षा गार्ड ची व्यवस्था करण्यात आली आहे. तेजस्विनी ग्रुप आयोजित बीडमध्ये रंग बरसे होली या कार्यक्रमात सहभागी महिलांना स्वादिष्ट जेवण, लाईव्ह डीजे, वेलकम ड्रिंक, प्रोफेशनल अँकर, सेल्फी पॉईंट, फुड स्टॉल, हायजेनिक कलर, विविध गेम्स आणि बक्षिसे ठेवण्यात आली आहेत तर सरप्राईज अशा सेलिब्रिटीची भेट देखील या कार्यक्रमात होणार आहे.

## धारूरमध्ये दहावी इंग्रजीचा पेपर फुटला; दोघे पोलिसांच्या ताब्यात



किल्ले धारूर : एसएससी बोर्ड दहावीच्या परीक्षा सध्या सुरू आहेत.१ मार्च शनिवार रोजी इंग्रजीचा पेपर असल्याने शिक्षण विभागाकडून विशेष खबरदारी घेतल्यानंतरही दोन मुलांनी साडेअकरा वाजता इंग्रजीचा पेपर खिडकीतून घेऊन पलायन केले. पेपर फुटल्याची बातमी सर्वत्र चविने चर्चिली जात असतानाच पोलीस निरीक्षक देविदास वाघमोड े यांनी अतिशय शिताफीने अवघ्या अर्ध्या तासात पेपर फोडणाऱ्या दोघांनाही ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवत फोडलेला पेपर जमा करून घेतला. बोर्ड परीक्षा मागील काही वर्षात धारूर शहरात शांततेत आणि व्यवस्थित पार पडत होत्या.परंतु यंदा सध्या सुरू असलेल्या एसएससी बोर्ड दहावीच्या १ मार्च शनिवार रोजी होत असलेल्या इंग्रजी पेपर काही पोरांनी फोडल्याची घटना धारूर शहरातील जिल्हा परिषद शाळेतील परीक्षा केंद्रावर घडली.

## कितीही डुबक्या मारा गद्दारीचा शिक्का कायम : उध्दव ठाकरे

मला आता गंगेचं पाणी दिलं मला मान आहे सन्मान आहे, इकडे पन्नास खोके घेतले आणि तिकडे डुबकी मारायची याला काय अर्थ? कितीही डुबक्या मारा गद्दारीचा शिक्का पुसला जाणार नाही, असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. ते मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. एकनाथ शिंदे हे नुकतेच महाकु ंभ मेळ्यासाठी प्रयागराजला जाऊन आले, यावरून उद्धव ठाकरे यांनी त्यांना जोरदार टोला लगावला आहे. जमलेल्या माझ्या तमाम मराठी बंधुनो आणि मातांनो, उद्या पेपरला येईल की उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्व सोडलं. त्यामुळे आजपासूनच सुरु करा की गर्व से कहो हम हिंदू है आणि अभिमानाने म्हणा मी मराठी आहे. एक ठिणगी पडली आणि उपऱ्याचं आक्रमन बाजूला केलं ती म्हणजे शिवसेना. शिवजयंती झाली,महाशिवरात्री झाली, गुढीपाडवा येईल व्हाटसअप वर तुम्ही जे मेसेज पाठवतात ते पण मराठीतच केले पाहिजेत, कारण पंतप्रधान म्हटले अमृताशी पैजा जिंके तुम्ही हसताय काय ? तुम्ही हसताय त्यामुळे मी पुढचं विसरतोय, असं म्हणत त्यांनी यावेळी हल्लाबोल केला. दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर देखील जोरदार हल्लाबोल केला. मला आता गंगेचं पाणी दिलं मला मान आहे

## आमदार ईद्रीस नायकवडीचा सोलापूर दौरा संपन्न

सोलापूर जिल्ह्याचा एक दिवस दौरा राष्ट्रवादी काँग्र ेस पार्टी अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार ईद्रीस नाईकवाडी संपन्न झाला यावेळी सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ने सबका राजा शिवाजी राजा कार्यक्रमाला उपस्थितीत लावली आणि अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला व अनेक पदाधिकार्यांना नियुक्ती पत्र देण्यात आली.. यावेळी आमदार नायकवडी यांनी मार्गदर्शन करतांना म्हटले की मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चा एक कार्यकर्ता आहे पक्ष वाढवून माझी जवाबदारी आहे सर्व समाजाला सोबत घेऊन विकास काम करणार आहे.पक्ष वाढीसाठी मी महाराष्ट्र दौरा करणार असुन अनेक इतर पक्षांच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांची पक्ष प्रवेश साठी फोन येत आहे.लोकासाठी काम करणारे कार्यकर्ते ्याना न्याय मिळवून देवू पक्ष वाढवु पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी.आगामी होणार्या महानगरपालिका नगरपालिका नगरपंचायत जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी तयार रहा असे आवाहन आमदार नायकवडी यांनी केले यावेळी पदाधिकारी ची भेटीगाठी घेतली पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या समस्या जाणून घेतल्या यावेळी सोलापूर शहराध्यक्ष अमिर शेख नजीर इनामदार व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थितीत होते

# भरत जाधव ग्रामगांधी राज्यस्तरीय समाजसेवा पुरस्काराने सन्मानित

### विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आ.इद्रीश नाईकवडी व समीर काजी यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित



दौलावडगाव - दैनिक दिव्य वार्ता आणि साप्ता.कश्मकशच्या चौदाव्या वर्धापन दिनानिमित्त गोरगरीब महिलांना शिलाई मशीन व गोरगरीब विद्यार्थ्यांना सायकल वाटप तसेच समाजातील विविध घटकांतील नागरीकांनसाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार वितरण २२ फेब्रुवारी रोजी बीड येथे करण्यात आले. आष्टी तालुक्यातील दौलावडगाव येथील आदर्श सरपंच भरत जाधव यांनी सार्वजनिक ,सामाजिक, धार्मिक , शैक्षणिक क्षेत्रातील गोरगरीब जनतेसाठी विकास कामे,जल हैं तो कल हैं ही दूरदृष्टी ठेवून नदी खोलीकरण,बांध बधाऱ्यांची बांधनी, जवळ जवळ तीन हजार वृक्ष लागवड व जतन केली.तसेच ग्राम दैवत यात्रा उत्सव, महापुरुषांच्या जयंती साजरी करणे,राजकिय संपर्क माध्यमातून सर्वसामान्य गोरगरिबांचा आवाज न्यायव्यवस्थेपर्यंत पोहचवत, प्रश्न मार्गी लावले, विविध सामाजिक उपक्रम घेऊन सर्वधर्मसमभाव हा संदेश देत सर्व धर्मातील लोकांना सोबत घेऊन काम करणे अशा उल्लेखनीय कार्यची दखल घेत सरपंच श्री भरत परशुराम जाधव यांना सन २०२४-२५ या वर्षाचा ग्राम गांधी राज्यस्तरीय समाज सेवा पुरस्कार साप्ता.कश्मकश दै.दिव्य वार्ता यांच्या कडून सन्मानित करण्यात आले. तसेच समाजातील विविध घटकांतील उल्लेखनीय कार्य आणि योगदान देणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार वितरण करण्यात आले भातोडी (पारगाव ) ता.जिल्हा अहमदनगर येथील पांडुरंग प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष श्री घनश्याम घोलप यांना पशुपक्षी व वृक्ष मित्र पुरस्काराने तर पाटण सांगवी येथील श्री समीर शेख यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्या बद्दल, दौलावडगाव येथील कासम शेख पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्या बद्दल मौलाना अबुल कलाम आझाद पुरस्काराने सन्मानपत्र व सन्मानचिन्ह वक्फ बोर्डाचे चेअरमन मा.समीर काजी,विधान परिषदेचे आमदार मा.इद्रीश नाईकवडी यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आल

# लोकांच्या सेवेचा घेतलेला वसा कधीही सोडणार नाही- माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर

अंबड ।प्रतिनिधी सर्वसामान्य कष्टाळू मेहनती आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांची फळे ही माझी खरी ताकद असून सर्वसामान्य कार्यकर्त्याच्या बळावरच मी मागील ४० वर्षे राजकारणात टिकून आहे अनेक बलाढ्य आणि धनाध्य ताकती माझ्यासमोर अनेक निवडणुकींमध्ये आल्या परंतु कार्यकर्त्यांच्या बळावर मी राजकारणात टिकून राहिलो लोकांच्या सेवेचा हाती घेतलेला हा वसा आणि कदापि



सोडणार नाही असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले. जालना येथे आईसाहेब लॉन्स व मंगल कार्यालयाचा उद्घाटन सोहळा व माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचा वाढदिवस संयुक्तरित्या साजरा करण्यात आला. आमदार बबनराव लोणीकर यांच्या वाढदिवसाच्या अवचित्य साधूनच मंगल कार्यालय व लॉन्स उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी मठाधिपती महंत भागवत गिरी महाराज, महंत बालकगिरी महाराज, गुरुवर्य ह भ प गजानन दादा शास्त्री महाराज, ह भ प नाना महाराज पुरुषोत्तमपुरीकर गुरुवर्य रामेश्वर महाराज आरगडे ह भ प भीम महाराज कनकवाडी ह भ प गणेश महाराज परतवाडी यांच्या प्रमुख उपस्थितीत आईसाहेब लॉन्स व मंगल कार्यालय चा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. आईसाहेब लॉन्स व मंगल कार्यालयाच्या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी आमदार अजु ्नराव खोतकर आमदार हिकमत उढान, आमदार नारायण कुचे, आमदार राजेश राठोड, माजी आमदार अरविंदराव चव्हाण, माजी आमदार संतोष सांबरे, विजय अण्णा बोराडे, उद्योगपती मनीष धूत, माजी आमदार अमरसिंह पंडित, शरद राव बोराडे, डॉ. प्रफुल्ल पाटील, सुकृत पाटील किशोर पवार, अनिरुद्ध खोतकर, भाऊसाहेब घुगे पंडितराव भुतेकर, संतोष मोहिते, अक्षय गोरंट्याल, रामेश्वर पाटील भांदरगे ज्ञानेश्वर पाटील भांदरगे उद्योगपती घनश्याम शेठ गोयल उद्योगपती समीर अग्रवाल, सीमाताई खोतकर, संध्या देठे, कमल तुल्ले, अंकुशराव अवचार बाबुराव शहाणे

## मातृतीर्थावर आयोजित बहुचर्चित बहुजन साहित्य संमेलनाचे उदघाटन भारत सरकारचे केंद्रीय मंत्री खा. मा. प्रतापराव जाधव यांचे हस्ते.....

बुलढाणा :
सर्वदूर ख्याती प्राप्त बहुजन साहित्य संघ, चिखली, जिल्हा बुलढाणा च्या वतीने, मातृतीर्थ अर्थात मा जिजाऊ यांची माहेर नगरी सिंदखेडराजा येथे दि. ३१ मार्च, २०२५ रोजी आयोजित राज्यस्तरीय सहाव्या बहुजन साहित्य संमेलनाच्या उदघाटनाची जबाबदारी भारत सरकारच्या केंद्रीय मंत्रालयातील आयुष मंत्री मा. प्रतापराव जाधव यांनी आवर्जून स्विकारली असून ब. सा. संघाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक कवी कलावंत आणि समर्पित सामाजिक सेवेसाठी सातासमुद्रापारची मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ. विजयकुमार कस्तुरे, अडव्होकेट, चिखली, उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक कवी आणि आपल्या



परकायाप्रवेशी कथाकथनासाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ. बबनराव महामुने, छ. संभाजीनगर, यांच्या सह सामाजिक व मानवीय सेवाभावी कार्यास्तव अमेरिकेतील विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित, ब. सा. संघाचे सचिव डॉ. डी.व्ही. खरात, चिखली, ब. सा. सं. चे सल्लागार तथा संपादक, प्रा. भास्कर इंगळे, बुलढाणा आणि ग्रामीण भागातील मौजे बोरगाव काकडे, ता. चिखली येथील भावकवी म्हणून प्रसिद्ध असलेले तथा ब. सा. सं. चे सह संघटक आयुष्मान अंकुश पडघान यांनी त्या संबंधीचे हार्दिक निमंत्रण पत्र आज दि. २८-०२-२०२५ रोजी मा. मंत्री महोदय बुलढाणा येथे आले असता, जिल्हाधिकारी कार्यालयातील त्यांच्या विशेष कक्षामधे, त्यांना दिले. आणि मा. मंत्री महोदयांनी सुध्दा अत्यंत आनंदाने सदर निमंत्रणाचा स्विकार करून सहर्ष, मातृतीर्थावर संपन्न होत असलेल्या उपरोक्त बहुजन साहित्य संमेलनाच्या उदघाटनासाठी आवर्जून उपस्थित राहण्याचे मन:पूर्वक आश्वासन दिले.

## परळीत सापडले १०९ अज्ञात मृतदेह-खासदार बजरंग सोनावणे

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या झालेल्या निर्घृण हत्येच्या घटनेनंतर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीबाबत अनेक दावे केले जात आहेत. तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्ती आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील घनिष्ठ संबंधांवरही उघडपणे बोललं जात आहे.दरम्यान, बीडचे खासदार बजरंग सोनावणे यांनी परळीबाबत एक खळबळजनक दावा केला आहे. परळीमध्ये १०९ अज्ञात मृतदेह सापडल्याचा दावा बजरंग सोनावणे यांनी केला आहे. आधीच बीड जिल्ह्यातील वातावरण स्फोटक बनलेलं असताना बजरंग सोनावणे यांनी हा दावा केला आहे. ते म्हणाले की, महादेव मु ंडेची हत्या हीसुद्धा दुर्दैवी घटना आहे. मात्र आता उघडकीस आलेली दोन चार प्रकरणं आहेत. मात्र पण असे १०९ मृतदेह बीड जिल्ह्यात परळी भागात सापडले आहेत. त्यांचं काय झालंय, त्यांची हत्या झाली आहे, हार्ट अ‍ॅटॅक आलाय, अपघात झालाय की आणखी काही झालंय, हे कळायला मार्ग नाही. मात्र अशा १०९ मृतदेहांचा पंचनामा झालेला आहे. तसेच अज्ञात म्हणून त्याबाबत कुठलीही कारवाई झालेली नाही. असे प्रकार आमच्या जिल्ह्यात घडतात आणि ते परळीमध्ये घडले आहेत. त्यामुळे येथील राजकारणाचा या प्रवृत्तीला पाठिंबा आहे, असं येथील लोकांना वाटत आहे, असा दावाही बजरंग सोनावणे यांनी केला.

# वैद्यनाथ सुपर स्पेशालिटी डेंटल क्लिनिकचा आज वर्धापन दिन: आरोग्यसेवेचा ११ वर्षांचा यशस्वी प्रवास!








परळी वैजनाथ...
दंतचिकित्सा क्षेत्रात अल्पावधीतच रुग्णांच्या पसंती असलेल्या डॉ मनोज मुंडे यांच्या वैद्यनाथ सुपर स्पेशालिटी डेंटल क्लिनिकच्या ११ वा वर्धापनदिन आज रविवार, दि २ मार्च रोजी साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्ताने ठेवलेल्या सत्यनारायण पूजा व पानसुपारी च्या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे डॉ मनोज मुंडे यांनी आवाहन केले आहे.

परळी वैद्यकीय क्षेत्रात ११ वर्षपूर्वी सुरू केलेल्या वैद्यनाथ सुपर स्पेशालिटी डेंटल क्लिनिकने रुग्णांना अनेक आधुनिक सुविधा देउ केल्या आहेत. संपूर्ण उपचार व रुग्णांचे समाधान यावर मागील दशकभरात हजारो रुग्णांना डॉ मनोज मुंडे यांनी वैद्यकीय सेवा दिली आहे. दंत समस्येवरील अनेक व्याधीवर निपुण उपचार करीत डॉ मनोज मुंडे यांनी रुग्णांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले आहे. आपल्या दशकभराच्या प्रवासात रुग्णांच्या अनेक क्लिष्ट सर्जरी डॉ मनोज मुंडे यांनी यशस्वीपणे केल्या आहेत. दातांच्या आरोग्यासंदर्भात विश्वासाचे केंद्र म्हणून वैद्यनाथ सुपर स्पेशालिटी डेंटल क्लिनिककडे पाहिले जाते.

रविवार दि २ मार्च २०२५ रोजी

### मान्यवरांची लाभणार उपस्थिती







वैद्यनाथ सुपर स्पेशालिटी डेंटल क्लिनिकच्या ११ व्या वर्धापनदिना निमित्ताने शॉप क्र ९२, अरुणोदय मार्केट येथील दवाखान्यात सत्यनारायण पूजेचे आयोजन केले आहे. यानिमित्ताने तिर्थप्रसाद व पानसुपारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन दादाराव संभाजीराव मुंडे व डॉ मनोज दादाराव मुंडे यांनी केले आहे.

# महाराष्ट्रातील खाजगी आराम बस सेवा: शासन धोरण, संधी आणि आव्हाने

डॉ.भारत कऱ्हाड

महाराष्ट्रातील खाजगी आराम बस सेवा ही राज्यातील प्रवासी वाहतुकीचा महत्त्वाचा भाग बनली आहे. वाढत्या लोकसंख्येसोबतच प्रवासाच्या सुलभतेसाठी आणि वेळेची बचत करण्यासाठी खाजगी बस सेवांचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार केला जात आहे. राज्यातील शासकीय परिवहन सेवा जरी कार्यरत असल्या, तरी त्या काही मर्यादांमुळे प्रत्येक प्रवाशांच्या गरजा पूर्ण करू शकत नाहीत. अशा परिस्थितीत, खाजगी बस सेवा अधिक वेगवान, आरामदायी आणि सुविधा-संपन्न पर्याय उपलब्ध करून देत आहे. म ात्र, या सेवांसमोर शासनाचे कठोर नियम, परवानग्यांचे अडथळे आणि स्पर्धात्मक बाजारातील आव्हानेही आहेत.महाराष्ट्रातील खाजगी बस सेवांचे इतिहास पाहता १९९० च्या दशकात या सेवांनी मोठ्या प्रमाणावर विस्तार केला. मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर अशा मोठ्या शहरांमधून सुरू झालेल्या या सेवांनी नंतर कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर विस्तार केला. या बसेस प्रवाशांसाठी विविध सुविधा देतात, जसे की वातानुकूलित कोचेस, स्लीपर सीट्स, ऑनबोर्ड मनोरंजन, मोबाइल चार्जिंग पॉईंट्स आणि ऑनलाइन बुकिंग सुविधा. यामुळे प्रवास अधिक सुकर झाला आहे.खाजगी बस सेवा सुरुवातीला असंघटित होती, मात्र प्रवाशांच्या वाढत्या संख्येमुळे शासनाने त्यांना नियमनाखाली आणले. महाराष्ट्र मोटार वाहन कायद्यांतर्गत खाजगी बस ऑपरेटरसाठी परवाने, कर प्रणाली आणि भाडे नियंत्रणासंबंधी नियम निश्चित करण्यात आले. याम ुळे बऱ्याच अंशी प्रवासी सुरक्षेची खात्री झाली, पण त्याचबरोबर या क्षेत्रावर अनेक निर्बंधही आले.

आजच्या घडीला महाराष्ट्रात सुमारे २५,००० हून अधिक खाजगी बस वाहतूकदार कार्यरत आहेत आणि रोज अंदाजे १० लाखांहून अधिक प्रवासी या सेवा वापरतात. विशेषतः मुंबई-पुणे, नागपूर-नाशिक, औरंगाबाद-कोल्हापूर आणि पुणे-सांगली या मार्गांवर खाजगी बस सेवेचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. लांब पल्ल्याच्या ६०% बसेस प्रवासी वाहतुकीसाठी वापरल्या जातात, तर उर्वरित ४०% बसेस शहरांतर्गत आणि पर्यटनासाठी वापरल्या जातात. खाजगी बस सेवांच्या विस्तारामुळे महाराष्ट्र ात मोठ्या प्रमाणावर रोजगार संधी निर्माण झाल्या आहेत. या व्यवसायावर अंदाजे १.५ लाख लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे अवलंबून आहेत. चालक, वाहक, क्लीनर, तंत्रज्ञ, व्यवस्थापक आणि ऑनलाइन बुकिंग सेवा पुरवणारे कर्मचारी यांना या क्षेत्रातून रोजगार मिळतो. याशिवाय, महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्रालाही या सेवांचा मोठा फायदा होतो. कोकणातील गणपतीपुळे, गोवा, अजंठा-वेरूळ, महाबळेश्वर, पंढरपूर यांसारख्या पर्यटन स्थळांपर्यंत पोहोचण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणावर खासगी आराम बस सेवांचा उपयोग करतात.तथापि, या सेवांसमोर अनेक आव्हानेही आहेत. शासनाच्या कठोर नियमनामुळे अनेक खाजगी बस वाहतूकदारांना अडचणींना सामोरे जावे लागते. परवान्यांसाठी लागणारा कालावधी खूप मोठा असतो आणि अनेक वेळा भ्रष्टाचारामुळे प्रक्रियेत विलंब होतो. तसेच, शासकीय परिवहन महामंडळ आणि खाजगी बससेवा यांच्यातील स्पर्धेमुळे अनेकदा नवीन धोरणे लागू केली जातात, जी खाजगी ऑपरेटरसाठी प्रतिकूल ठरतात.शुल्कवाढीवर लादलेले निर्बंध हा देखील एक मोठा अडथळा आहे. खाजगी बस सेवा पुरवण्यासाठी होणाऱ्या खर्चात सातत्याने वाढ होत आहे, मात्र शासनाने शुल्कवाढीसंबंधी कडक नियम घातले आहेत. यामुळे बस मालकांना आर्थिक अडचणी येतात आणि काही वेळा सेवा बंद करावी लागते.याशिवाय, बेकायदेशीर बस ऑपरेटर्स आणि परवाना नसलेल्या बसेसच्या वाढत्या संख्येमुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही बस वाहतूकदार वेळेचे पालन करत नाहीत, तिकीट दरात मोठा फरक असतो आणि सेवा गुणवत्तेच्या बाबतीत तडजोड करावी लागते. त्यामुळे प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागतो. महाराष्ट्र सरकारने २०२० मध्ये एस.टी. महामंडळाला आर्थिक तोटा होत असल्याने खाजगी बस सेवांवर अधिक निर्बंध लावण्याचा विचार केला होता. परंतु, यामुळे हजारो लोकांचा रोजगार धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली. परिणामी, सरकारने नवीन धोरणे ठरवताना सर्व संबंधित पक्षांचा विचार करणे गरजेचे आहे.नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने खाजगी बस सेवा अधिक प्रभावी बनवता येऊ



शकते. इलेक्ट्रिक बस, स्मार्ट तिकीट बुकिंग प्रणाली, ऋझड ट्रॅकिंग आणि प्रवासी सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक उपाययोजना केल्यास हा व्यवसाय अधिक शाश्वत होऊ शकतो. तसेच, शासनाने अनावश्यक अटी आणि निर्बंध हटवून या क्षेत्राला अधिक स्वायत्तता द्यावी, जेणेकरून खाजगी बस ऑपरेटर अधिक चांगल्या सुविधा देऊ शकतील.

खाजगी बस सेवा महाराष्ट्रातील प्रवासी वाहतुकीचा अविभाज्य घटक बनली आहे. प्रवाशांना जलद, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव देण्यासाठी या सेवांचे महत्त्व मोठे आहे. शासनाने या क्षेत्राला पुरेसा पाठिंबा दिल्यास आणि नियमनाच्या प्रक्रियेत सुलभता आणल्यास, महाराष्ट्र ातील खाजगी आराम बस सेवा भविष्यात आणखी मजबूत आणि प्रवाशांसाठी अधिक सोयीस्कर ठरेल. भविष्यात इलेक्ट्रिक बसेस, पर्यावरणपूरक वाहतूक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश झाल्यास, ही सेवा अधिक प्रभावी आणि पर्यावरणस्नेही ठरेल. त्याम ुळे, शासनाने स्पष्ट धोरण आखून खाजगी बस वाहतूकदार आणि प्रवाशांच्या गरजांचा विचार करणे आवश्यक आहे.

डॉ. भारत क-हाड, प्राचार्य वराडकर महाविद्यालय, दापोली, जिल्हा रत्नागिरी.

## १०० पेक्षा अधिक पोलिस अधिकाऱ्यांनी केले अर्ज, आमचा जिल्हा बदला!




संतोष देशमुख हत्या प्रकरणाने गाजत असलेल्या बीड जिल्ह्यात ड्युटी नको रे बाबा असे म्हणत जिल्ह्यातील १०७ पोलीस अधिकाऱ्यांनी बदलीसाठी विनंती अर्ज केला आहे. त्यामुळे बीडच्या पोलिस दलात खळबळ उडाली असून नेमकं बीड जिल्ह्यात आहे तरी काय ज्यामुळे पोलीस अधिकारी ड्युटी करायचं नको म्हणत आहेत,असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तसचं उपमुख्यमंत्री अजित पवार पालकमंत्री असलेल्यां बीड जिल्ह्यात का नको? या अगोदर अनेक अधिकाऱ्यांची बीड जिल्ह्यासाठी पसंती होती. मात्र अचानकच बदलीसाठी विनंती अर्ज आल्याने चर्चा होत आहे. अजित पवार यांनी पालकमंत्री पदाची चुकीची गोष्ट खपवून घेतली जाणार नाही असा सज्जड दम आहे दिला होता. संतोष देशमुख हत्या प्रकरण, लोकसभा विधानसभा निवडणुकीमुळे वाढलेला जातिवाद, त्यातून होणारे आरोप प्रत्यारोप यामुळे बीड जिल्हाच नको असे काही अधिकारी खासगीत नको म्हणत आहेत. बीड जिल्ह्यातील एकूण पोलीस निरीक्षक ते उपविभागीय पोलिस अधिकारी अशी १८८ पदे आहेत. त्यापैकी कार्यरत १७२ आहेत. या पैकी १०७ लोकांनी बदलीसाठी विनंती अर्ज केले. काही जणांनी राज्याच्या पोलीस महासंचालकाकडे अर्ज केला आह

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २ मार्च २०२५
https://lokaarambh.com




## सामाजिक समतोल राखण्यासाठी सदभावना पदयात्रेत सामील व्हा - राहुल सोनवणे

माजलगाव ।प्रतिनिधी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील मसाजोग ते बीड सदभावना पदयात्राचे काँग्रेसच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील काँग्र ेस ऍक्शन मोडवर आली असून,खासदार सौ.रजनी पाटील यांनी विशेष लक्ष केंद्रित केल्याची चर्चा असून सदरील सदभावना पदयात्रा यशस्वी करण्याच्या अनुषंगाने खासदार रजनी पाटील यांच्या सुचनेवरून काँग्र ेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे पाटील सक्रिय झाले असून,शहरातील काँग्रेस भवन येथे तालुकाध्यक्ष नारायण होके यांनी आढावा बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी सदरील बैठकीचे प्रस्ताविक दत्ता कांबळे यांनी केले. सदरील कार्यक्रमात काँग्र ेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष यांनी जिल्ह्यातील गेल्या तीन चार महिन्यातील गुन्हेगारीची पार्शश्वभूमी वर मुद्देसूद भाष्य करत, जिल्ह्यातील असणारी ओळख ही सामाजिक समता, सहिष्णूता व पुरोगामी विचार तसेच समतावादी विचाराचा वारसा व सामाजिक समतोल अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यातील राजकारण विरहित समतावादी,पुरोगामी विचार जपणारे व संविधानाचा पुरस्कार करणाऱ्या प्रत्येकाने सदभावना पदयात्रेत सहभागी व्हावे,असे आवाहन उपस्थितांना काँग्र ेस भवन येथे केले.यावेळी जेष्ठ नेते, प्रवीणकुमार शेफ,प्रताप मोरे, ॲड.इनामदार,महावीर मस्के, शेख अहेमद,नाथाभाऊ घडसे, यांची प्रमुख उपस्तीथी होती. तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहराध्यक्ष अफरोज तांबोळी,बळीराम कारके,नेहाल इनामदार, अक्षय थोरात,विनोद सुर्वे, विष्णू चाटे ,श्रीनिवास शेळके, प्रकाश क्षीरसागर सह काँग्रेस कार्यकर्ते यांनी प्रयत्न केले.यावेळी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिवसागर शेलूकर यांनी केले.

# वाल्मिक कराडला रसद पुरवणाऱ्यावरही कारवाई करा : खासदार बजरंग सोनवणे





बीड : मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड हाच सूत्रधार असल्याचे पोलिसांनी दाखल केलेला आरोपपत्रातून समोर आले आहे. ट्रॉसिटी, खंडणी आणि हत्या या तिन्ही घटनांचा एकत्रित उल्लेख आरोपपत्रातून करण्यात आला आहे. यावर बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. बजरंग सोनवणे म्हणाले की, ज्या दिवशी हत्या झाली त्यानंतर पहिल्या तासातच मी मीडियासमोर येऊन बोललो होतो. की या प्रकरणातील मास्टरमाइंड पकडला पाहिजे. ही अतिशय निंदनीय घटना घडली आहे. त्याची स्पष्टता आज होत आहे. मी हे वारंवार सांगत होतो की, याचा मास्टरमाइंड परळीला बसायचा. त्यांनी संपूर्ण जिल्ह्यात दहशत निर्माण केली होती. वाल्मिक कराड परळीत येऊन बसायचा वाल्मिक कराडने गोरगरीब लोकांना त्रास देणे, त्यांच्याकडून खंडणी गोळा करणे आणि आपली दहशत निर्माण करणे, असे प्रकार केलेत. हे आरोपपत्र २९ नोव्हेंबरपासून पुढचे घेतले आहे. त्याच्या अगोदरचा सुद्धा खंडणीचा गुन्हा अवादा कंपनीने २८ मे रोजी दाखल केला होता. तो सुद्धा यात घेतला पाहिजे. तो सुद्धा असाच प्रकार आहे. त्यातील जो आरोपी आहे. तो सुद्धा यांचाच साथीदार आहे. इथे सर्व गुंड माफिया फिरत आहेत, ते सुद्धा या प्रकरणात घेतले पाहिजे. त्यांनी प्रत्येक तालुक्याला एक एक माणूस नेमला होता. उस्मानाबाद कळम, परंडा, भूम तालुक्यात देखील यांची माणसं आहेत. सत्तेचा गैरवापर करणे, पदावर बसवलेल्या पोलिसांचा फायदा घेणे. मर्जीतले अधिकारी बीडमध्ये आणून बसवणे, असे प्रकार सुरू होते. गेल्या पाच वर्षात फार मोठी दादागिरी, गुंडगिरी, दहशत बीडमध्ये पसरली होती. हे प्रकरण २८ मे पासून सुरू झालेले आहे. मात्र, ते प्रकरण तिथेच दाबले गेले. सीसीटीव्ही मध्ये आणखी दोन-चार जण आढळून आलेले आहेत. ते आरोपीला पळून जाण्यासाठी साथ देत होते, त्यांना देखील सह आरोपी केले पाहिजे. आज या घटनेतील मास्टरमाइंड समोर आलेला आहे. त्याला कोण रसद पुरवत होता. त्याला कोणाचा आशीर्वाद होता. त्याच्यावरही कारवाई झाली पाहिजे, असे त्यांनी म्हटले.

# छत्रपती शिवरायांबद्दल विषारी गरळ ओकणा-या प्रशांत कोरडकरला परळीत जोडो मारो आंदोलन

परळी प्रतिनिधी. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल विषारी गरळ ओकणा-या जातीयवादी प्रशांत कोरडकरच्या विरोधात परळीत जोरदार निदर्शने करण्यात आली. त्याच्या प्रतिमेस आंदोलकांनी जोडे मारून त्याचा जाहीर निषेध केला व राज्य सरकारने कोरडकरवर कडक कारवाई करण्याची मागणी केली.

याबाबत अधिक माहिती अशी की प्रसिद्ध इतिहासकार इंद्रजीत सावंत यांच्याशी मोबाईल वरून बोलत असताना जातीयवादी प्रवृत्तीच्या प्रशांत कोरडकर याने महाराष्ट्राची अस्मिता असलेले रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल अतिशय अपमानास्पद वक्तव्य केली या वक्तव्याचा महाराष्ट्र सह देशभर सर्वत्र निषेध होत आहे तसेच कोरडकरच्या विरोधात शिवप्रेमी रस्त्यावर उतरले आहेत.

परळी वैजनाथ येथे आज दिनांक २८ फेब्रुवारी रोजी शिवप्रेमी तसेच आंबेडकर प्रेमी नागरिकांच्या वतीने सकाळी ११ वाजता राणी लक्ष्मिबाई टॉवर येथे जातीवादी प्रशांत कोरडकर च्या विरोधात जोरदार निदर्शने करण्यात आली तसेच त्याच्या प्रतिमेला आंदोलकांनी चप्पल व बुट मारून जाहीर निषेध केला तसेच राज्य सरकारने अशा




प्रवृत्तींना ठेचून काढले पाहिजे अशा प्रकारची मागणी केली व फुले, शाहू, आंबेडकरांचा महाराष्ट्र महापुरुषांचा अपमान कदापिही सहन करणार नाही असा कडक इशारा यावेळी दिला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते उत्तम माने, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते लुगडे महाराज, सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे, ज्येष्ठ पत्रकार रानबा गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते सेवकराम जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते बाबा शिंदे,नितीन राव शिंदे, शिवाजीराव देशमुख, बालाजी काळे, मनसेचे तालुकाध्यक्ष श्रीकांत पाथरकर , प्राचार्य प्रा. अतुल दुबे,शहराध्यक्ष वैजनाथ कळसकर, दिनेशजी गजमल,केशव साबळे पाटील, एकतावादी रिपाईचे शहराध्यक्ष सुनील कांबळे, केशवराव मुंडे, भागवत साबळे, ज्येष्ठ नेते मुक्ताराम गवळी, महबूब कुरेशी, हरिभाऊ बुरकुले, पत्रकार निवृत्ती खाटीक, हनुमंत माने, भगवानराव काकडे आदी उपस्थित होते.

## बब्बर खालसा इंटरनॅशनल संघटनेशी संबंधित आरोपी नांदेड पोलिसांच्या ताब्यात

### नांदेड गोळीबार प्रकरणातील मुख्य आरोपी नांदेड पोलिसांच्या ताब्यात, दोन मुख्य आरोपींसह तिस-यालाही अटक

----नांदेड - १० फेब्रुवारी रोजी शहरात गुरुद्वारा परिसरातील घडलेल्या गोळीबार प्रकरणातल्या दोन मुख्य आरोपींना पंजाब पोलीस व दहशतवाद विरोधी पथकाने ताब्यात घेतल्यानंतर त्यांना विमानाने नांदेडात आणण्यात आले. हे दोघेही बब्बर खालसा इंटरनॅशनल संघटनेशी संबंधित असून त्यांच्यासोबत आणखी एकास ताब्यात घेण्यात आले आहे. या तिघांना न्यायालयाने १० दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात आरोपींची संख्या ८ झाली आहे.



नांदेड शहरातल्या गुरुद्वारा परिसरात १० फेब्रुवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजता एकाने केलेल्या गोळीबारात रवींद्रसिंघ दयालसिंघ राठोड (वय ३०) याचा जागीच मृत्यू झाला होता. तर गुरमीतसिंघ सेवालाल (वय ३२) हा गंभीर जखमी झाला. कुख्यात दहशतवादी हरविंदरसिंघ ऊर्फ रिंधा याच्या भावाची २०१५ मध्ये हत्या झाली होती. या हत्येतील मुख्य आरोपी गुरमीतसिंघ सेवालाल याला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती. २२ जानेवारी रोजी गुरमीतसिंघ पॅरोल रजेवर सुटल्यानंतर हत्येचा बदला म्हणून रिंधाच्या सांगण्यावरून त्याच्यावर गोळीबार झाला होता. गुरमितसिंघ व त्याचा नातेवाईक रवींद्रसिंघ हे दोघे थांबलेले असतांना सकाळी झालेल्या या गोळीबारात रवींद्रसिंघ याचा मृत्यू झाला तर गुरमितसिंग बचावला. या प्रकरणी नांदेडमधील वजिराबाद पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. नांदेडात गेल्या अनेक दिवसांपासून हरविंदरसिंघ ऊर्फ रिंधा याची दहशत आहे. व्यापारी, डॉक्टर व अन्य व्यावसायिक यांना खंडणीसाठी त्यांच्या टोळीने सळो की पळो करून सोडले होते. बांधकाम व्यावसायिक संजय बियाणी यांच्या हत्येनंतर पोलिसांनी या टोळीच्या मुसक्या आवळल्या होत्या. परंतु, मुख्य आरोपी रिंधा अद्याप पोलिसांच्या हाती लागला नाही.

# पांढरी देवस्थानच्या भव्य सभागृह बांधकामाची भाजपा नेते राजेश कराड यांच्याकडून पाहणी

लातूर - रेणापूर तालुक्यातील खरोळानजीक असलेल्या मौजे पांढरी येथील श्री विठ्ठल नारायण महाराज देवस्थान परिसरात तीन कोटी रुपये खर्चाच्या भव्य सभागृह बांधकामाची पाहणी भाजपाचे नेते राजेश कराड यांनी शनिवारी सकाळी केली.श्री विठ्ठल नारायण महाराज यांचे पांढरी येथील देवस्थान अनेक वर्षापूर्वीचे आहे. या देवस्थानवर पंचक्रोशीतील अनेक भाविक भक्ताची मोठी श्रद्धा आहे. दरवर्षी विविध धार्मिक कार्यक्रमाच्या आणि उत्सवाच्या निमित्ताने भाविकांची मोठी गर्दी होत असते. या मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याच्या पर्यटन विभागाकडून तब्बल तीन कोटी रुपयाचा निधी मंजूर करून घेतला सदर निधीतून १०० बाय १०० फुट साईजचे भव्य दिव्य सभागृह बांधण्यात येत आहे या कामाची राजेश कराड यांनी करून समाधान व्यक्त केले.

प्रारंभी श्री विठ्ठल नारायण महाराज देवस्थानात मनोभावे दर्शन घेतले. देवस्थानातील परमपूज्य ज्ञानेश्वर महाराज यांचा पांडुरंगाची मूर्ती भेट देऊन यथोचित सन्मान केला. सभागृह बांधकाम कामाची पाहणी करून माहिती घेतली.



यावेळी राजेश कराड यांनी संबंधित ठेकेदार व अभियंता यांना सभागृहाचे हे काम देवस्थानचे आहे. वास्तु वर्षानुवर्ष टिकणारी असल्याने सदरील काम दर्जेदार व्हावे अशी सुचना केली.याप्रसंगी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, सांगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, ओम चव्हाण, मोहनराव राऊतराव, बाळूआप्पा हेणे, रमाकांत फुलारी, राम शिंदे, सुरेश जाधव, शालिक गोडभरले, राजकुमार मानमोडे यांच्यासह इतर अनेक जण होते.

## परभणीत बेकायदेशीर अतिक्रमण हटविले

परभणी - शहरातील महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोरून वसमत रस्त्याकडे जाणाया रस्त्यावर प्रशासकीय इमारतीच्या संरक्षण भिंतीलगत रात्रीतून बेकायदेशीररित्या अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत महापालिकेने अतिक्रमण हटविले.शहरातील महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोरून वसमत रस्त्याकडे जाणाया रस्त्यावर प्रशासकीय इमारतीच्या संरक्षण भिंतीलगत रात्रीतून बेकायदेशीररित्या अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. याबाबतचा व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत शनिवारी (दि.१) मनपा आयुक्तांनी पथक पाठवून ते अतिक्रमण हटविले. रातोरात होणारे अतिक्रमण महापालिकेच्या पथकाने हटवले . शहरातील प्रशासकीय इमारतीसमोर अशाच प्रकारे अगोदर टपरीवजा एक छोटे दुकान सुरू करण्यात आले, त्याबाजूला एका रात्रीत थेट रस्त्यालगतच बेकायदेशीरपणे बांधकाम सुरू करीत जागा हडपण्याचा प्रयत्न करण्यात आला. काही जागरूक नागरिकांनी मोबाईलवर त्याचा व्हिडिओ काढून समाज माध्यमांवर व्हायरल केला. त्यानंतर मनपा सहाय्यक आयुक्तांनी नागरिकांच्या तक्रारी व भावनांची दखल घेत घटनास्थळी लगेच पथक पाठवून ते अतिक्रमण हटविण्यास सुरुवात केली.

# आरटीई अंतर्गत मिळणाऱ्या गोरगरिबांच्या प्रवेशावर डल्ला मारण्यासाठी खोटी कागदपत्रे सादर

### आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी मुदतवाढ खोटी कागदपत्रे सादर करून तीन शाळात पालकांनी मिळवले प्रवेश

बीड ।प्रतिनिधी शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत आर्थिक दुर्बल, वंचित, गोरगरीब विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळेत मोफत प्रवेश मिळावा या हेतूने शासन आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवते मात्र या प्रवेश प्रक्रियेत खरे लाभार्थी विद्यार्थी वंचित राहत असून खोट्या कागद पत्रांच्या आधारे धनदांडगेच गोरगरिबांच्या प्रवेशावर डल्ला मारण्याचे काम करत आहेत. यात शहरातील पोदार इंग्लिश स्कूल, गुरुकुल इंग्लिश स्कूल आणि संत ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल या तीन शाळेत प्रवेश मिळवा यासाठी पालकांनी अपडेट केलेले आधार कार्ड, खोटी भाडेपत्र आणि उत्पन्नाचे प्रमाणपत्र जोडली आहेत. या सर्व प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांची कागदपत्रे तपासून त्यांचे प्रवेश रद्द करण्यात यावेत अशी मागणी आरटीई कार्यकर्ते तथा शिवसंग्राम चे युवा नेते मनोज जाधव यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली आहे. बीड शहरातील पोदार इंग्लिश स्कूल, गुरुकुल इंग्लिश स्कूल आणि संत ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल शाळेत आरटीई प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनि खोटे कागदपत्र जसेकी आधार, भाडेपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र दाखल करून प्रवेश मिळवले आहेत.तेव्हा तालुका स्तरीय निवड समितीने महिनाभराच्या कालावधीत अपडेट केलेले आधार तपासावेत ज्या पत्त्याचा आधार असेल त्यांचे आणखी एक रहिवासी पुरावा घ्यावा, भाडेपत्र सदर केलेल्या पालकांच्या सदर केलेल्या भाडेपत्र ठिकाणी पालक राहतात का यासाठी त्यांच्या घरी भेट द्यावी आणि उत्पन्नाचे खोटी कागदपत्रे सादर करून तीन शाळात पालकांनी मिळवले




प्रवेश मनोज जाधव यांची जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार प्रमाणपत्र हे अर्ज दाखल करण्या पूर्वीचे घ्यावे जेणे करून आरटीई बोगस प्रवेशला आळा बसलेल आणि खऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतील असे निवेदनात मनोज जाधव यांनी म्हटले आहे. आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी मुदतवाढ जिल्ह्यातील २१४ खासगी शाळांत २ हजार २३५ जागा आरटीई प्रवेशासाठी उपलब्ध होत्या या जागा करिता ५ हजार ७८१ इतके अर्ज प्राप्त झाले होते. यातून आता २ हजार १८३ विद्यार्थ्यांची मोफत प्रवेशासाठी निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी पर्यंत मुदत देण्यात आली होती मात्र आता ही मुदत १० मार्च पर्यंत वाढवण्यात आली आहे.


This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com